PUNE RESEARCH WORLD ISSN 2455-359X
AN INTERNATIONAL JOURNAL OF INTERDISCIPLINARY STUDIES VOL 10, ISSUE 01

# चंद्रपूर जिल्ह्यातील आदिम कोलाम जमातीमधील कुटुंबाकडील आवश्यक कागदपत्रांचा अभाव एक समस्या

**अंबादास भगवान तिरनकर**
**संशोधनकर्ता**
**जनता महाविद्यालय, चंद्रपूर.**
**महाराष्ट्र भारत**

**डॉ. आशिष कृष्णाजी महातळे**
**मार्गदर्शक**
**जनता महाविद्यालय, चंद्रपूर.**
**महाराष्ट्र भारत**

**सारांश:-**

चंद्रपूर जिल्हा महाराष्ट्र राज्यातील महत्वाचा जिल्हा आहे. चंद्रपूर जिल्ह्याचा समावेश महाराष्ट्रातील पूर्व विदर्भ प्रदेशामध्ये होतो. चंद्रपर जिल्ह्याला औद्योगीक जिल्हा तसेच आदिवासी बहूल जिल्हा म्हणून ओळखल्या जाते. चंद्रपूर जिल्ह्याला गोंड राजे खांडक्या बल्लहाळशाहा यांचा इतिहास लाभलेला आहे. आजही अनेक वास्तू त्याची प्रचिती दर्शविते. चंद्रपूर जिल्ह्यामध्ये गोंड, परधान अशा महत्वपूर्ण आदिवासी जमातींसोबतच कोलाम ही आदिम जमात वास्तव्यास आहे. कोलाम या जमातीला केंद्रशासनाकडून आदिम जमात (Particularly Vulnerable Tribal Group - PVTG) म्हणून अधिसुचित केलेले आहे. चंद्रपूर जिल्ह्यामध्ये कोरपना, राजूरा, जिवती व वरोरा या तालुक्यामध्ये प्रामुख्याने कोलाम जमाती वास्तव्यास आहे. कोलाम जमात ही मुख्य प्रवाहामध्ये येण्याच्या दृष्टीने शासनाकडून अनेक योजना राबविण्यात येत आहे. परंतु या योजनांचा लाभ घेण्याकरिता अनेक दस्तावेजांची आवश्यकता गरज असते. (जसे की आधार कार्ड, जातीचा दाखला, राशन कार्ड, उत्पन्नाचा दाखला इ.) परंतू हे दाखले मिळविण्याकरिता चंद्रपूर जिल्ह्यातील आदिम कोलाम जमातीतील कुटुंबांना अनेक समस्येला तोंड द्यावे लागतात त्यामुळेच ते विविध योजनांचा लाभ घेण्यापासून वंचित राहतात. त्यामुळेच या शोधनिबंधामध्ये त्या कारणांचा शोध घेऊन त्यावर प्रभावी उपाय योजनांची शिफारस करण्यात आलेली आहे.

बीजशब्द**:-** आदिम जमात, अधिसुचित, दस्तावेज, योजना, मुख्य प्रवाह, आधार कार्ड, जातीचा दाखला, जात वैधता प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, राशन कार्ड इ.

**प्रस्तावना:-**

चंद्रपूर जिल्हा हा महाराष्ट्र या राज्यातील महत्वाचा जिल्हा असून या जिल्ह्याचा समावेश पुर्व विदर्भ या प्रदेशामध्ये होतो. तसेच चंद्रपूर या जिल्ह्याला खांडक्या बल्लहाळशाह या गोंड राजाचा मोठा इतिहास लाभलेला आहे. चंद्रपूर जिल्ह्याला औद्योगीक जिल्हा तसेच गोंड राजाचा जिल्हा म्हणून सुध्दा ओळखल्या जाते. चंद्रपूर जिल्हयामध्ये एकुण 15 तालुके असून सन 2011 च्या जणगणनेनुसार चंद्रपूर जिल्ह्याची एकुण लोकसंख्या ही 22,04,907 आहे. त्यापैकी अनुसुचित जमातीची एकुण लोकसंख्या ही 3,89,441 आहे. त्याचे प्रमाण एकुण लोकसंख्येच्या 17.67 टक्के आहे. तर अनुसुचित जमातीच्या एकुण लोकसंख्येपैकी कोलाम लोकसंख्या ही 7995 आहे. चंद्रपुर जिल्ह्यातील आदिम कोलाम जमात कोरपना, राजुरा, जिवती तसेच वरोरा या चार तालुक्यातील एकुण 68 गुडा/पाडा/गावामध्ये वास्तव्यास आहे.

महाराष्ट्रामध्ये अनुसुचित जमातीमध्ये एकुण 45 जमातींचा समावेश होतो. या एकुण 45 अनुसुचित जमातीमध्ये अशा काही जमाती आहेत की त्या इतर आदिवासी जमातीच्या तुलनेमध्ये अत्यंत मागसलेल्या आहेत. त्यांच्या या मागासलेपणामुळे शासनाने त्यांचे वर्गीकरण अतिमागास / आदिम म्हणजेच 'प्रिमिटिव्ह' (Primitive) जमात म्हणून केलेले आहे. केंद्रशासनाने अधिसुचित केल्यानुसार महाराष्ट्रामध्ये कोलाम, कातकरी आणि माडीया गोंड या तीन आदिवासी जमाती आदिम (Primitive) जमाती म्हणुन वर्गीकृत केलेल्या आहेत. महाराष्ट्रामध्ये कोलाम जमात हि मुख्यत: यवतमाळ, चंद्रपूर, वर्धा व नांदेड या जिल्ह्यात आढळतात. तर कातकरी जमात ही रायगड व ठाणे या जिल्ह्यात दिसुन येतात आणि माडीया गोंड ही जमात प्रामुख्याने गडचिरोली जिल्ह्यात वास्तव्यास आहे.

आदिम जमाती मुख्य प्रवाहामध्ये याव्यात याकरिता केंद्र शासनाकडून “आदिम जमाती संरक्षण तथा विकास कार्यक्रम” ही महत्वाची योजना राबविण्यात येते या योजनेकरिता केंद्र शासनाच्या वतीने विशेष निधीचे प्रावधान करण्यात येतात. तसेच राज्य शासनाच्या वतीने सुध्दा अनेक कल्याणकारी अशा विकासात्मक योजना आदिम जमातीकरिता राबविण्यात येतात..

शासनाच्या कोणत्याही योजनांचा लाभ घेण्याकरिता शासनाने ठरवून दिलेल्या नियम व अटीचे पालन करावे लागतात तसेच योजनेचा लाभ घेण्याकरिता आवश्यक अशा कागदपत्रांची पुर्तता करावी लागतात. परंतु चंद्रपूर जिल्ह्यातील आदिम कोलाम जमातीकडे आजही आवश्यक असे कागदपत्रे (जसे जातीचा दाखला, आधार कार्ड, अधिवास प्रमाणपत्र, राशन कार्ड, उत्पन्नाचा दाखला) पुर्णपणे उपलब्ध असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अनेक योजनांचा लाभ घेण्यापासून चंद्रपूर जिल्ह्यातील आदिम कोलाम जमात वंचित असल्याचे दिसून येत असल्यामुळे शासनाच्या अनेक योजनांची प्रभावी अंमलबजावणी होताना दिसून येत नाही त्याचा परिणाम म्हणून आजही चंद्रपूर जिल्ह्यातील कोलाम जमातीचा आर्थिक, सामाजिक तथा शैक्षणिक विकास झालेला नाही त्यामुळे ही जमाती अतिशय मागासलेली आहे.

**उद्दिष्टे**

1. कोलाम जमातीकडे आवश्यक दस्तावेज उपलब्ध नसण्याच्या कारणांचा शोध घेणे.

2. योजनांच्या लाभाकरिता कागदपत्रांचे महत्व समजून घेणे.

3. कागदपत्रांच्या जागरुकतेचा अभ्यास करणे.

4. आवश्यक कागदपत्रांच्या उपलब्धतेच्या प्रमाणाचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती**

या संशोधनासाठी प्राथमिक साधन मुलाखत अनुसुची चा वापर करण्यात आला. लोकसंख्येच्या प्रमाणामध्ये 20 टक्केच्या मर्यादेमध्ये एकुण 386 कुटुंबाची (सदस्य संख्या 1690) यादृच्छिक नमुना म्हणून निवड करण्यात आली. त्यांचे घरी भेटी देऊन मुलाखत अनुसुचीनुसार माहिती गोळा करण्यात आली. दस्तऐवजांची उपलब्धता ही 'होय/नाही' आधारावर मोजली गेली, ज्यामध्ये कुटुंबातील सर्व सदस्यांकडे दस्तावेज उपलब्ध असणे आवश्यक होते. तसेच दुय्यम तथ्य संकलन साधनांचा वापर केला गेला ज्यामध्ये संदर्भ ग्रंथ, पुस्तके, इंटरनेट जाळे इत्यादींचा समावेश आहे. हा अभ्यास अध्ययन क्षेत्रातील निवड केलेल्या 386 कोलाम कुटुंबांच्या प्राथमिक सर्वेक्षण डेटावर आधारित आहे. मुलाखत अनुसुची द्वारे डेटा संकलित केला गेला असून वर्णनात्मक सांख्यिकीमध्ये शेकडेवारीचा वापर करुन तक्त्याच्या सहाय्याने प्राप्त माहितीचे वर्गीकरण आणि विश्लेषण करण्यात आले.

**माहितीचे विश्लेषण**

**कोलाम जमातीकडील उपलब्ध असलेल्या कागदपत्रासंबधीची माहिती:-**

कोणत्याही योजनेचा लाभ घेण्याकरिता कागदपत्रांची आवश्यकता असते. एखाद्या योजनेचा लाभ घेण्याकरिता शासनाने ठरवून दिलेली कागदपत्रे आपल्याकडे उपलब्ध नसेल तर आपल्याला त्या योजनेचा लाभ घेता येत नाही. त्यामुळेच आपल्याला त्या योजनेच्या लाभापासून वंचित राहावे लागते. कोलाम जमातीतील कुटुंबे मुख्य प्रवाहामध्ये येण्याच्या दृष्टीकोणातून शासनाने कोलाम जमातीकरिता अनेक विकासात्मक योजना राबविण्यात येत आहे परंतु कागदपत्रांच्या अभावामुळे अनेक कोलाम कुटुंबे लाभापासून वंचित असल्याचे दिसून येते. चंद्रपूर जिल्ह्यातील आदिम कोलाम कुटुंबाकडे उपलब्ध असणाऱ्या कागदपत्रांबाबतची माहिती पुढील प्रमाणे आहे.

आदिम कोलाम जमातीला शासकीय योजनांचा लाभ तसेच इतर आवश्यक कामाकरिता आधार कार्ड, जातीचा दाखला, जात वैधता प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र आणि राशन कार्ड अशा आवश्यक कागदपत्रांची नियमित आवश्यकता भासत असते. अध्ययन क्षेत्रामध्ये नमुना म्हणून एकूण आदिम कोलाम जमातीच्या लोकसंख्येपैकी 20 टक्केच्या प्रमाणामध्ये एकुण 386 आदिम कोलाम कुटुंबाची नमुना म्हणून निवड करण्यात आलेली आहे. नमुना म्हणून निवड केलेल्या कुटुंबाकडील आवश्यक कागदपत्र उपलब्धतेची माहिती खालील तक्त्यामध्ये दर्शवण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | कागदपत्रांचा तपशील | उपलब्धता | कुटुंबांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| 1 | **आधार कार्ड** | **होय** | **375** | **97.15** |
| | | **नाही** | **11** | **2.85** |
| 2 | **जातीचा दाखला** | **होय** | **41** | **10.62** |
| | | **नाही** | **345** | **89.38** |
| 3 | **जात वैधता प्रमाणपत्र** | **होय** | **1** | **0.26** |
| | | **नाही** | **385** | **99.74** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 4 | **अधिवास प्रमाणपत्र** | **होय** | **15** | **3.89** |
| | | **नाही** | **371** | **96.11** |
| 5 | **राशन कार्ड** | **होय** | **357** | **92.49** |
| | | **नाही** | **29** | **7.51** |

**स्त्रोत:- सर्वेक्षणाच्या प्राथमिक आकडेवारीवरुन**

**आधार कार्ड:-**

भारतामध्ये आधार कार्ड हा अतिशय महत्त्वाचा ओळख पुरावा असून यानुसारच भारतातील प्रत्येक व्यक्तीला एक वेगळ्या पद्धतीचा ओळख क्रमांक मिळालेला आहे. आधार कार्ड असल्यास अनेक शासकीय कामे होताना दिसून येते. वरील तक्त्यामध्ये अध्ययन क्षेत्रामध्ये निवड केलेल्या एकूण 386 कुटुंबापैकी असे कुटुंब ज्या कुटुंबात असणाऱ्या सर्व सदस्यांकडे आधार कार्ड उपलब्ध आहे असे एकुण 375 कुटुंब आढळून आले. त्यांचे प्रमाणे 97.15% आहे. तर असे कुटुंब ज्या कुटुंबातील काही सदस्यांकडे आधार कार्ड उपलब्ध नाही असे एकूण 11 कुटुंब आढळून आले असून त्यांचे प्रमाण 2.85% दिसून येते.

अध्ययन क्षेत्रामध्ये निवड केलेल्या एकूण 386 कुटुंबातील एकुण सदस्य संख्या ही 1690 असून सदस्य संख्येनुसार अवलोकन केले असता एकुण 1674 सदस्यांकडे आधार कार्ड उपलब्ध असल्याचे दिसून येते. तर असे एकुण 16 सदस्य आढळून आले त्यांच्याकडे आजही आधार कार्ड उपलब्ध नसल्याचे दिसून येते. त्यामुळे आधार कार्ड अतिशय महत्वाचा दस्तावेज असताना सुध्दा काही कोलाम सदस्यांकडे आधार कार्ड उपलब्ध नाही.

**जातीचा दाखला:-**

कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ घेत असताना किंवा आरक्षणाचा लाभ घेणकरिता सुध्दा जातीचा दाखला अत्यंत आवश्यक आहे. तसेच जातीचा दाखल्यानुसारच संबंधित व्यक्ती कोणत्या जातीचा आहे ते निष्पन्न होत असते. अध्ययन क्षेत्रातील ज्या कुटुंबातील सर्व सदस्यांकडे जातीचा दाखला उपलब्ध आहे अशी केवळ 41 कुटुंबे आढळून आली असुन त्यांचे प्रमाण 10.62% आहे. ज्या कुटुंबातील सर्वच सदस्यांकडे जातीचा दाखला उपलब्ध असल्याचे दिसून येत नाही अशी एकूण 345 कुटुंब असुन त्यांचे प्रमाण 89.38% आहे.

अध्ययन क्षेत्रामध्ये निवड केलेल्या एकूण 386 कुटुंबातील एकुण सदस्य संख्या ही 1690 असून सदस्य संख्येनुसार अवलोकन केले असता एकुण 874 सदस्यांकडे जातीचा दाखला उपलब्ध असल्याचे दिसून येते. तर एकुण 816 सदस्यांकडे अजूनही जातीचा दाखला उपलब्ध नाही. यावरून असे दिसून येते की आदिम कोलाम जमातीतील बहुतांश सदस्यांकडे जातीचा दाखला उपलब्ध नसल्याने ते शासकीय योजनेच्या लाभांपासून वंचित असल्याचे दिसून येते.

**जात वैधता प्रमाणपत्र (व्हॅलिडीटी):-**

जात वैधता प्रमाणपत्र हे सुद्धा एक महत्त्वपूर्ण दस्तावेज असून. जात वैधता प्रमाणपत्राची आवश्यकता कोणतेही उच्च शिक्षण घेणेकरिता तसेच कोणत्याही शासकीय नोकरीसाठी सुध्दा अनु. जमातीतील उमेदवारांकडून जात वैधता प्रमाणपत्र सादर करावी

लागत असल्याने हा अतिशय महत्वाचा दाखला आहे. वरील माहितीनुसार कोलाम जमातीतील असे कुटुंब ज्या कुटुंबातील सर्व सदस्यांकडे जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध आहे असे केवळ 1 कुटुंब आढळून आले असून त्यांचे प्रमाण 0.26% आहे. तर कोलाम जमातीतील असे कुटुंब ज्या कुटुंबातील सर्व सदस्यांकडे जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नाही असे एकूण 385 कुटुंब आढळून आले असून त्यांचे प्रमाण 99.74% आहे.

अध्ययन क्षेत्रामध्ये निवड केलेल्या एकूण 386 कुटुंबातील एकुण सदस्य संख्या ही 1690 असून सदस्य संख्येनुसार अवलोकन केले असता केवळ 16 सदस्यांकडे जातीचा वैधता प्रमाणपत्र उपलब्ध असल्याचे दिसून येते. तर एकुण 1674 सदस्यांकडे अजूनही जात वैधता प्रमाणत्र उपलब्ध नाही. यावरून असे दिसून येते की आदिम कोलाम जमातीतील बहुतांश सदस्यांकडे जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नाही.

**अधिवास प्रमाणपत्र:-**

अधिवास प्रमाणपत्र हा सुद्धा एक महत्त्वाचा दस्तऐवज असून शासकीय योजनेचा लाभ घेण्याकरिता या दस्तऐवजाची सुद्धा मागणी होत असते. अध्ययन क्षेत्रातील कोलाम जमातीतील असे कुटुंब ज्या कुटुंबातील सर्व सदस्यांकडे अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध आहे असे केवळ 15 कुटुंब आढळून आले असून त्यांचे प्रमाण 3.89% आहे. तर कोलाम जमातीतील ज्या कुटुंबातील सर्व सदस्यांकडे अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नाही असे एकूण 371 कुटुंब असून त्यांचे प्रमाण 96.11% दिसून येते.

अध्ययन क्षेत्रामध्ये निवड केलेल्या एकूण 386 कुटुंबातील एकुण सदस्य संख्या ही 1690 असून सदस्य संख्येनुसार अवलोकन केले असता एकुण 526 सदस्यांकडे अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध असल्याचे दिसून येते. तर एकुण 1164 सदस्यांकडे अजूनही अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नाही. यावरून असे दिसून येते की आदिम कोलाम जमातीतील बहुतांश सदस्यांकडे अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसल्याने ते शासकीय योजनेच्या लाभांपासून वंचित असल्याचे आढळते.

**राशन कार्ड:-**

राशन कार्ड हा सुद्धा एक महत्त्वाचा दस्तावेज आहे. राशन कार्ड असेल तर स्वस्त धान्य दुकानातून धान्याची उचल करता येतात तसेच त्या कुटुंबामध्ये किती सदस्य संख्या आहे याची सुध्दा माहिती राशन कार्डच्या माध्यमातून उपलब्ध होत असते. अध्ययन क्षेत्रातील आदिम कोलाम जमातीतील ज्या कुटुंबाकडे राशन कार्ड उपलब्ध आहे अशी एकूण 357 कुटुंब आढळून आली असून त्यांचे प्रमाण 92.49% आहे. तर आदिम कोलाम जमातीतील अशी कुटुंब त्या कुटुंबाकडे अद्यापही राशन कार्ड उपलब्ध नाही अशी एकूण 29 कुटुंब आढळून आलेली आहे व त्यांचे प्रमाण 7.51% आहे.

**परिणाम**

1. कागदपत्रांच्या आवश्यकतेबाबत जागरुकता नसल्याने अनेक कुटुंबाकडे आवश्यक कागदपत्रे उपलब्ध नाही.
2. बहुतांश कोलाम कुटुंबांकडे कागदपत्रे उपलब्ध नसल्याने ते विविध शासकीय योजनांच्या लाभापासून वंचित आहे.
3. आवश्यक पुराव्याअभावी कागदपत्रे काढण्यास अडचणी येत आहे.

4. शासकीय योजनांच्या माहितीचा अभावामुळे कागदपत्राचा वापर कमी आहे.

**निष्कर्ष**

1. आधार कार्ड हे आवश्यक दस्तावेज असताना सुध्दा एकुण 11 कुटुंबातील 16 सदस्याकडे उपलब्ध नाही. त्याचे प्रमाण 2.85 टक्के आहे. त्यामुळे अनेक लाभ घेता आलेले नाही.
2. जातीचा दाखला हा कोणत्याही योजनेच्या लाभाचा आवश्यक दाखला असल्याने एकुण 345 कुटुंबातील 816 सदस्याकडे तो उपलब्ध नाही त्याचे प्रमाण 89.38 टक्के आहे. त्यामुळे अनेक योजनांचा लाभ मिळालेला नाही.
3. जात वैधता प्रमाणपत्राची नोकरी तसेच उच्च शिक्षणामध्ये आवश्यकता असताना एकुण 385 कुटुंबातील 1674 सदस्याकडे प्रमाणपत्र उपलब्ध नाही त्याचे प्रमाण 99.74 टक्के आहे. आवश्यक पुराव्याच्या अभावामुळे जात वैधता प्रमाणपत्र मिळालेले नाही.
4. अनेक योजनांच्या लाभाकरिता अधिवास प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. एकुण 371 कुटुंबातील 1164 सदस्यांकडे ते आजही उपलब्ध झालेले नाही त्याचे प्रमाण 96.11 टक्के आहे.
5. स्वस्त धान्य दुकानातून लाभाकरिता तसेच इतर शासकीय कामाकरिता राशन कार्डची आवश्यकता आहे. एकुण 29 कुटुंबाकडे आजही राशन कार्ड उपलब्ध नाही त्याचे प्रमाण 7.51 टक्के आहे त्यामुळे ते धान्याच्या लाभापासून वंचित आहे.

शासनाने आदिम कोलाम जमातीकरिता अनेक विकासात्मक शासकीय योजना निर्माण केलेल्या आहे. त्या योजनांच्या लाभाकरिता कागदपत्राच्या पुर्ततेची आवश्यकता असते त्यामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील बहूसंख्य आदिम कोलाम कुटुंबाकडून कागदपत्रांची पुर्तता होत नसल्याने ते अनेक योजनांच्या लाभापासून वंचित राहत आहे त्याचाच परिणाम म्हणजे शासनाने ठरविलेले उद्दिष्ट पुर्ण होत नाही त्यामुळे आजही आदिम कोलाम जमात मुख्य प्रवाहामध्ये आलेली नाही.

**शिफारशी**

1. PM-JANMAN सारख्या योजनेच्या माध्यमातून कागदपत्रासाठी विविध शिबीरांचे आयोजन करण्यात यावे.
2. कागदपत्रांच्या आवश्यकतेबाबतची जागरुकता निर्माण करण्याकरिता त्याचा आश्रमशाळेच्या माध्यमातून तसेच अंगणवाडी सेविका व आशा यांच्या माध्यमातून प्रचार व प्रसार करणे.
3. आदिम कोलाम जमातीकडे 1950 च्या पुरावा नसल्यास गृहचौकशी करुन दाखला देण्यात यावा.
4. दस्तावेज काढण्यासाठी येणाऱ्या खर्चाची तरतूद आदिवासी विकास विभागाकडून विशेष योजनेच्या माध्यमातून करण्यात यावी.

5. दुर्गम भागामध्ये सेतू सुविधा केंद्राची उभारणी करण्यात यावी.

**संदर्भ:-**

1. सर्वेक्षण डेटावरुन प्राथमिक आकडेवारी.

2. महाराष्ट्रातील आदिवासी समाज जीवन, डॉ. देविदास खोडवाड

3. गोंड परधान आणि कोलाम, डॉ. शैलजा देवगावकर व डॉ. जी. एस. देवगावकर

4. आदिवासी समाजाचे समाजशास्त्र, डॉ. प्रदिप आगलावे

5. बोधनकर सु व अलोणी वि. "सामाजिक संशोधन पध्दती" श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर चतुर्थ आवृत्ती

6. घाटोळे रा. ना. (2009), "समाजशास्त्रीय संशोधन तत्वे व पध्दती" श्री. मंगेश प्रकाशन नागपूर,

7. भांडारकर पु. ल. (1976), "सामाजिक संशोधन पध्दती, महाराष्ट विद्यापिठ ग्रंथ निर्मिती मंडळ विद्या बुक्स औरंगाबाद

8. गारे गोविंद, "महाराष्ट्रातील अनुसुचित क्षेत्र आणि अनुसुचित आदिवासी जमाती" कामिन्टिनेन्टल प्रकाशन, विजनयनगर, पुणे